# वसई विरार शहर महानगरपालिका
## मुख्यालय लेखा विभाग, विरार

जा.क्र.मुलेविअ/मु.लेखा/ २२/२०२३-२४
दिनांक २५/०५/२०२३

## "जाहिर दरपत्रक"

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लेखा विभागामध्ये खाली उल्लेख केल्याप्रमाणे काम करावयाचे असून सदर काम करण्यास इच्छुक संस्था / ठेकेदार यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामांच्या बाबींचे दर (सर्व करासहीत) दि. ३१/०५/२०२३ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, लेखा विभाग, विरार (पू) यांचेकडे आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | दर (रुपये) (सर्व करांसहीत) दर नमुद करताना प्रति नोंद तपासणी / लेखापरिक्षणाचा दर नमुद करावा. | |
|---|---|---|---|
| | | अंकात | अक्षरात |
| १ | सन २०२२-२३ या वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिकेअंतर्गत मुख्यालय व सर्व ९ प्रभागातील सर्व प्रकारच्या महसुली जमाच्या वार्षिक नोंदीचे प्रती गट अंदाजीत २.५ लक्ष नोंदीचे लेखापरिक्षण करणे<br>**गटाचा तपशिल -**<br>गट क्र. १ - प्रभाग समिती ए व सी,<br>गट क्र.२ - प्रभाग समिती बी, डी व मुख्यालय,<br>गट क्र. ३ - प्रभाग समिती ई व एफ,<br>गट क्र.४ - प्रभाग समिती जी, एच व आय,<br><br>**कामाचे स्वरुप** :- रोख पुस्तक, धनादेश, धनाकर्ष व ऑनलाईन इ. द्वारे जमा झालेल्या प्रत्येक नोंदींची पडताळणी रोजकिर्द बरोबर करणे. सदर रकमा बँकेत जमा झाल्याच्या नोंदी तपासणे. / ताळमेळ करुन घेऊन लेखापरिक्षण अहवाल सादर करणे. | | |
| २ | काम पुर्ण करण्याचा कालावधी :- | दि: ३० जून २०२३ पर्यंत. | |

## -: अटी - शर्ती :-

१. दि. ०१ जानेवारी, २०२२ रोजी इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली द्वारे जारी केलेले वैध "सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस" प्रमाणपत्र असावे. सनदी लेखापाल यांस किमान मागील पाच वर्षाचा अनुभव असावा. सदर संस्था ही सनदी लेखापाल संस्था, भागीदारी संस्था

किंवा मर्यादित दायित्व भागीदारी असलेली संस्था यापैकी संस्था असल्यास दरपत्रक भरण्यास पात्र राहील.

२. सनदी लेखापाल (चार्टर्ड अकाऊंटन्ट) याने शासकीय कार्यालय / सार्वजनिक उपक्रम / महामंडळे / स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील लेखापरिक्षणाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

३. आयकर कायदा १९६१ च्या कलम ४४ एबी नुसार संस्थेच्या मागील दोन वर्षाचे (सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३) लेखापरिक्षण झाल्याचे अथवा आयकर वार्षिक विवरणपत्र असले पाहिजे. सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील दरपत्रकधारकाची वार्षिक उलाढाल किमान रु. १० लक्ष वा त्यापेक्षा अधिक असल्याचे सनदी लेखापालाने त्याच्या वैध UDIN क्रमांकासह प्रमाणित केलेले असले पाहिजे.

४. दरपत्रकधारकाचे आयसीएआय नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड जोडणे बंधनकारक राहील.

५. दरपत्रकास मंजुरी दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून २ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

६. दरपत्रकासोबत कामाच्या एकूण रकमेच्या १ टक्का इसारा रक्कम (उदा. १० लक्ष रकमेच्या १ टक्का रक्कम रु. १० हजार) डी. डी. स्वरुपात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे तांत्रिक बाबीच्या लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावा.

७. दरपत्रक मंजूरीनंतर संविदा झाल्यावर करारनामा व कार्यादेश देण्यापुर्वी ३ टक्के सुरक्षा अनामत रक्कम डी. डी. स्वरुपात वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे सादर करण्यात यावी.

८. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांना राहील.

९. दरपत्रक बिनशर्त असावे. सशर्त दरपत्रक नाकारण्यात येईल.

१०. प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी कोणतेही एक दरपत्रक स्विकारण्याचा अथवा सर्व त्या दराने काम करण्यास तयार असल्यास पॅनल करण्याचा अधिकार किंवा दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी राखून ठेवला आहे.

११. आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील जमा लेखापरिक्षण अहवाल ३० जुन २०२३ पर्यंत सादर करणे आवश्यक राहील. त्यादृष्टीने पुरेशा प्रमाणात मनुष्यबळाची नियुक्ती करण्याची दक्षता निवड झालेल्या सेवा पुरवाठादाराने घ्यावयाची आहे. त्यासाठी कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. विलंब कालावधीसाठी प्रतिगट प्रतिदिन रु. २०००/- इतक्या दंडाची आकारणी केली जाईल.

१२. खाडाखोड केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही किंवा अपात्र करण्यात येईल.

१३. दरपत्रके विहीत मुदतीमध्ये व कार्यालयीन वेळेमध्ये वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील. सदर दरपत्रके स्वतःचे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दोन लिफाफा पद्धतीने (तांत्रिक बाबीचा लिफाफा क्र. १ व वित्तीय बाबींचा लिफाफा क्र. २) दि. ३१/०५/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

१४. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. ३१/०५/२०२३ रोजी सायं. ५.०० वाजता मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे दालनात दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत / अनुपस्थित असल्यास देखील उघडण्यात येतील.

१५. कामाचे प्रदान एकूण तपासलेल्या नोंदी x प्रतिनोंद तपासणी दर याप्रमाणे परिगणना करण्यात येऊन त्यामधून अनुज्ञेय शासकीय वजाती करण्यात येतील.

दिनांक :- २५/०५/२०२३

ठिकाण :- वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय

25.05.23

मुख्य लेखा व वित्त अधिकारी

वसई विरार शहर महानगरपालिका